**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक १०६४**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- ०५.०२.२०१९.**

**पोलीस अधिक्षक कार्यालय जालना येथील कनिष्ठ लिपीक श्री. नागसेन ज्ञानोबा पवार यांना ३,०००/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा वं पत्ता | :- | आरोपी लोकसेवक श्री.नागसेन ज्ञानोबा पवार, वय ३३ वर्ष कनिष्ट लिपीक (वेलफेअर), पोलीस अधिक्षक कार्यालय जालना, रा.जालना |
| २ | गुन्हा घ. तारीख व ठिकाण | :- | दि.०५.०२.२०१९ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय जालना येथे |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ३,०००/- रुपये |

याबाबत हकीगत अशी आहे की, तक्रारदार हे पोलीस कर्मचारी असुन यांनी त्यांचे आईचे शस्त्रक्रियेसाठी पैशाची आवश्यकता असल्याने त्यांनी पोलीस कलयाण निधीचे कर्जासाठी पोलीस अधिकक्षक जालना यांचेकडे अर्ज दिला होता. सदर अर्ज साहेबासमोर ठेवण्याचे काम आरोपी लोकसेवक श्री.पवार यांचेकडे होते. सदर अर्ज साहेबा समोर ठेवुन मंजुर करवुन देण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री.पवार यांनी तक्रारदार यांचे कडे लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांची लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कडे तक्रार केली.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. ०५.०२.२०१९ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय जालना येथे जावुन लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक श्री.पवार यांनी तक्रारदार यांचे कडे ३०००/- रुपये लाचेच्या मागणीची पडताळणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन आज दि.०५.०२.२०१९ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय जालना येथे लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे कडुन ३०००/- रुपयाची लाच पंचासमक्ष घेतांना त्यांना रंगेहात लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. आलोसे श्री.पवार यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक डॉ.श्रीकांत परोपकारी, अपर पोलीस अधिक्षक श्री. जिरगे, ॲ.क.ब्यु. औरंगाबाद, पोलीस उप अधिक्षक श्री.रविंद्र डी.निकाळजे,यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री.काशीद, श्री.विनोद चव्हाण तसेच कर्मचारी श्री.संतोष धायडे, श्री.प्रदीप दौंडे, श्री.संजय उदगीरकर, श्री.गंभीर पाटील, श्री.रामचंद्र कुदर,श्री.महेंद्र सोनवणे, श्री. ज्ञानेश्वर म्हस्के, श्री.संदीप लव्हारे, श्री.रमेश चव्हाण श्री.प्रवीण खंदारे यांनी पार पाडली.

तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८३७८९११६४७, पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.

पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना